**स्मरणपत्र-१**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी - **411018**
क्र.मातवि/**8**/कावि/92/20
दिनांक- 22/ 06 /2020

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-411018

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर विभागप्रमुख या सदरांतर्गत विभागप्रमुखांचे सध्यस्थितीतील छायाचित्र अपलोड करणेकामी पाठविणेबाबत...

संदर्भ:- 1) केंद्रशासन माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार श्री. सरदार रविंद्र सिंह यांचा दि. १२/०५/२०२० रोजीचा ई-मेल.

2) परिपत्रक क्र.मातवि/८/कावि/ ५६/**२०२०,** दिनांक- २८ /०५ /२०२०

३) श्री. सरदार रविंद्र सिंह यांचा दिनांक १७ जुन २०२० रोजीचा ई-मेल.

श्री. सरदार रविंद्र सिंह यांनी संदर्भ क्र. १ व ३ चे ई-मेलद्वारे पालिकेच्या संकेतस्थळावर पालिकेच्या विभागप्रमुखांचे फोटो व माहिती अपलोड करणेत आली असुन त्यामधील फोटो हे वर्तमानकाळातले नसुन भुतकाळातले दिसुन येत असलेबाबत कळविले होते.

त्यानुसार संदर्भ क्र. २ चे परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभाग / विभागप्रमुखांना **पालिकेच्या संकेतस्थळावरील विभाग** या सदरांतर्गत प्रसिद्ध करणेत आलेले विभागप्रमुखांचे फोटे तसेच विभागाची माहिती जुनी असल्यामुळे सद्यस्थितीतील फोटो व माहिती पाठविणेबाबत कळविणेत आले होते. तथापी अद्यापही बहुतेक विभागांची माहिती प्राप्त झालेली नाही.

तरी सर्व संबंधित विभाग / विभागप्रमुखांना कळविणेत येते की, विभागांमार्फत मनपा संकेतस्थळावरील विभाग या सदरांतर्गत प्रसिद्ध करणेत आलेले विभागप्रमुखांचे फोटे तसेच विभागाची माहिती अद्ययावत करुन संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी पाठविणेत यावी. तसेच विभागामार्फत मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेल्या इतर सर्व प्रकारच्या माहितींमध्येही काही बदल असल्यास तसे बदल करुन **विभागप्रमुखांचे सध्यस्थितीतील फोटो , विभागांतर्गत अपडेट माहिती व संकेतस्थळावरील विभागाने प्रसिद्ध केलेली इतर सर्व माहिती** अपडेट करुन सॉफ्टकॉपीसह दिनांक २६/०६/२०२० पर्यंत संकेतस्थळावर अपलोड करणेकामी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविणेत यावी.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८